
15-16

ISSN: 2229-4856

Abhisaran

VOL. XV SPECIAL ISSUE APRIL 2016

# RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS



PART II

*Editors*

Dr. Vasant Sanap

Mr. Shailesh Akulwar

186

# अनुक्रमणिका


१. महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार- प्रा.ए.टी. करपे । ८

२. महात्मा गांधीचे मानवाधिकारासंबंधी विचार- डॉ. आनंद सुभाष करडे । १२

३. महात्मा गांधी आणि शैक्षणिक धोरण - प्रा.आनंदराव जाधव । १५

४. महात्मा गांधी यांचे हिंसा आणि शांतता शिक्षण विषयक तत्त्वज्ञान
-प्रा. डॉ. आसिया चिश्ती । २०

५. गांधिजी आणि जागतिकरण- प्रा.डॉ.सुभाष ज.देशमुख, श्री सतिश बा.आहेर । २४

६. महात्मा गांधी आणि परधर्मसहिष्णुतेचा वैश्विक धर्म
- प्रा. डॉ. अनंत मदन आवटी । २८

७. महात्मा गांधीजींची ग्राम स्वराज्य संकल्पना- प्रा.अनिता एस. गायकवाड । ३३

८. महात्मा गांधीजींची मूलोद्योगी शिक्षण योजना - प्रा. रसाळ अर्चना मुरलीधर । ३७

९. गांधीजींचे शैक्षणिक विचार - एक चिंतन- प्रा. अरुण पडघन । ४१

१०. महात्मा गांधींजीची पंचतत्वे- डॉ. आशा मुंडे । ४५

११. महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार - प्रा. डॉ. अशोक टिपरसे । ४९

१२. महात्मा गांधी यांचे ग्रामस्वराज्याचे आदर्शवत विचार- अश्विनी व्ही. बोर्डे । ५४

१३. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना
- डॉ. बी. एम. चव्हाण । ५८

१४. महात्मा गांधी आणि शैक्षणिक धोरण - डॉ.सौ.माधवी बादाडे । ६३

१५. महात्मा गांधीजींचे शिक्षणसंबंधीचे धोरण -बडे माधव विनायकराव । ६६

१६. आज गांधीजीच्या विचारांची उपयुक्तता - प्रा.बागल जे.एस. । ७३

१७. शेतकऱ्यांविषयी महात्मा गांधीच्या विचाराचा चिकित्सक अभ्यास
- प्रा.डॉ. भगवान डोंगरे । ७७

१८. वैश्विक शांततेकरिता महात्मा गांधीजींचे योगदान - बालाजी श्रीपाल दडपे । ८०

१९. महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना
-प्रा. डॉ. बालासाहेब बाबूराव टेकाळे । ८३

२०. महात्मा गांधीचे ग्रामस्वराज्या संबंधी विचार :तुलनात्मक व टिकात्मक विश्लेषण
- प्रा. बनसोडे विलास भारत । ८७

२१. पूर्वपिठीका : सत्याग्रहाचा पहिला प्रयोग -महादेव गडदे । ९०

२२. महात्मा गांधी आणि सामाजिक,आर्थिक,राजकीय विचार- भगवान शिंदे । ९६

२३. महात्मा गांधींची विचारप्रणाली-एक चिंतन - प्रो.डॉ.भारती रेवडकर । ९९

## 11.
## महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार

**प्रा. डॉ. अशोक टिपरसे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,देगलूर महाविद्यालय देगलूर जि. नांदेड

**प्रस्तावना :-** म. गांधीजींनी विचारापेक्षा अचरनाला अधिक महत्व दिले त्यांचे विचार आजही महत्वाची भूमीका साकारु शकतात. आधुनिक काळात गांधीजीचे विचार अत्यंत महत्वाचे आहेत. त्यांनी भारतीय जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श केला आहे. धर्म, शिक्षण, राजकारण, अर्थकारण, नीती व कायदा आरोग्य, शेती इ. प्रत्येक संदर्भात त्यांचे मौलिक योगदान असल्याचे दिसून येते. सन 1920 ते 1947 अशी 27 वर्ष भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे त्यांनी नेतृत्व केले. म. गांधी यांनी अर्थशास्त्राची सैध्दांतिक मांडणी केली नाही. त्यांच्या आर्थिक विचाराचे विवेचन क्रमबध्द नाही. त्यांचे आर्थिक विचार लेख, भाषणे व पत्र व्यवहारातून आढळून येतात. गांधीजीचे आर्थिक विचार विखुरलेले आढळतात. म. गांधीच्या आर्थिक विचारात नीतिशास्त्र आणि नैतिकता या मूलभूत तत्वावर आधरलेले आहे. म. गांधी यांनी अर्थशास्त्र व नीतिशास्त्र एकच मानत असत. अर्थशास्त्रामुळे वैयक्तिक राष्ट्रीय नैतीक कल्याणात घट होत असेल तर ते अनैतिक किंवा दुष्ट कृत्य समजावे अर्थशास्त्राने मानवाची दारिद्र्य आणि परावलबिंत्व या पासुन मुक्तता केली पाहिजे म. गांधीच्या मतानुसार खरे अर्थशास्त्र सामाजिक न्यायाच्या तत्वावर आधारलेले असले पाहिजे. एकंदर परिस्थितीचे प्रत्यक्ष निरीक्षण केले भारतातील जनसामान्याचे अतिव दुःख, दैन्य व दारिद्र्य पाहून त्याचे मन हेलावले अशा जनतेचे प्रतिनिधीत्व करावयाचे तर त्याचे दुःख प्रत्यक्षपणे अनुभवले पाहिजे. त्यांच्याशी एकरुप झाले पाहिजे, या गोष्टीला त्यांनी प्रत्यक्षात आपल्या अचरणातून पुढे साकार केले. म. गांधी यांच्या विचारांचा, त्यांच्या कार्याच्या संपूर्ण समाजावर फार मोठा प्रभाव आहे. समाजाच्या अनेक घटकावर प्रभाव टाकणाऱ्या अनेक विषयावर त्यांनी मांडलेले विचार, दिलेले रचनात्मक कार्यक्रम यांचा भारतीय समाज जीवनावर प्रभाव झालेला आहे. त्यांचे विचार केवळ भारतापुरते मर्यादित नसुन संपूर्ण विश्वाला माणुसकीचा संदेश देणारा आहे. त्यांनी आपल्या जीवनात स्विकारलेल्या वअचरणात आणलेल्या कांही गोष्टीचा त्यातल्यात्यात आर्थिक विचारांचा आढावा या लेखात घेण्याच्या प्रयत्न केलेला आहे.

**उद्देश (Objectives) :-**

- म. गांधीच्या विचाराधारेत आर्थिक संकल्पना समजून घेणे.
- आधुनिक व्यवस्थेत म. गांधीच्या आर्थिक विचारांची उपयोगिता तपासणे

- म. गांधीच्या आर्थिक विचाराचा अभ्यास करणे.

**गृहितके (Hypothesis) :-**

- म. गांधीजीचे आर्थिक विचार मानव केंद्री होते.
- म. गांधीजीचे आर्थिक विचार प्रेरणादायी आहे.
- ग्रामस्वराज्य व शोषणविहीन समाज हे म. गांधीजींच्या आर्थिक विचारांचे प्रमुख साधन होय.

**संशोधन पध्दती (Research Method) :-** सदरील शोध निबंधात संपूर्णपणे द्वितीय स्त्रोताचा उपयोग करण्यात आला आहे. त्यासाठी म. गांधीच्या स्वतःरचीत साहित्याची आणि गांधी संदर्भात लिहलेल्या अन्य लेखन साहित्याचा वापर करण्यात आला आहे. यात प्रामुख्याने विविध संदर्भग्रंथ, मासिके, साप्ताहिके आहेत. या शोध निबंधात गांधीजीचे आर्थिक विचार मांडले आहेत.

**ग्रामीण विकासात म. गांधीजीचे विचार :-** ग्रामीण विकास म्हणजे गरीबांच्या नैसर्गिक व मानवी संसाधनाचा अनुकूल उपयोग करुन त्याच्या जिवनमानात सुधारणा करणे होय सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये समाज परिवर्तनाची गती वाढलेली आहे. यामध्ये नव्या गरजा, नव्या सोयी तसेच नवे सुख साधने निर्माण होत आहेत. गांधीजीचे ग्रामीण विकास तत्वज्ञान म्हणजे भारतीय समाजाच्या गरजा भगविण्याचे एक आचार प्रधान तत्वज्ञान आहे. त्यात साध्य आणि साधने यांचा योग्य समन्वय साधला गेला आहे. हेच म. गीर्जीना ग्रामीण विकास म्हणजे सर्वांची उन्नती सर्वांचे कल्याण साधने हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्टे आहे. ग्रामीण विकासात सर्वांचे कल्याण अभिप्रेत आहे. म. गांधीजींची भौतिक विकासापेक्षा अधुनिक व नैतिक मुल्यांना प्राध्यन्य दिले आहे.

गांधीजींनी भारतातील खेड्यांचे पुनरुज्जीवन करण्याची कल्पना मांडली. म्हणजे प्राचीन काळात भारतातील खेडी जशी स्वयंपूर्ण होती तशी पुनः निर्माण करण्याची त्यांनी कल्पना मांडली. प्राचीन काळात भारतातील प्रत्येक खेड्यात उत्पादन, विभाजन व उपभोग चा तिन्ही गोष्टी एकाच वेळी घडत असत. यासाठी कोणतेही खेडे हे दुसऱ्या कोणत्याही खेड्यावर अवलंबून नसायचे. परंतू आधुनिक काळात भारतातील खेड्यांचे चित्र पार पालटून गेले खेड्यातील लोकांचे दारिद्र्य प्रचंड प्रमाणात वाढले. शेतकरी आत्महत्या करीत आहेत अशी आपल्या खेड्याची दैना झ ाली. गांधीजी नेहमी म्हणत असत की, खरा भारत खेड्यात पाहायला मिळतो. भारतातील खेड्यांचा कायापालट झाला पाहिजे त्यासाठी गांधीजींनी ग्राम स्वराज्याची कल्पना मांडली

**खादी आणि ग्रामोद्योग :-** गांधीजीने खादी आणि खादी तयार करणारा चरख्याला खुपच महत्व दिल्याचे दिसते तसेच खादी उद्योग व ग्रामोद्योगाचे सविस्तर चर्चा केलेली दिसते. कारण गांधीजीने खादी ही अहिंसेची प्रतिमा माणली होती आणि चरख्याला त्यांनी सुर्यमालेतील सुर्याचे स्थान दिले. चरखा हा सुर्य मानला तर अन्य ग्रामोद्योग हे सुर्यभोवती फिरणारे सुर्यमालेतील ग्रह ठरतील असे गांधीजी म्हणत. यावरुन गांधीजींनी सर्व ग्रामोद्योगात खादी या ग्रामोद्योगाला महत्व प्राप्त करुन दिले. म. गांधीजींनी दक्षिण अफिकेतून भारता परत आल्यावर खादीची चळवळ सुरु केली. गांधीजींचा असा विश्वास होता की खेड्यातील कोट्यावधी लोकांना शेतीपासून मिळणाऱ्या अत्यल्प उत्पन्नाला पुरक उत्पन्न खादी उद्योगाला मिळेल त्यामुळे खेड्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून त्यांच्या जिवनमानात सुधारणा होईल असी त्यांची धारणा होती. खेड्यातील प्रत्येक माणसाने स्वताला लागणारे खादी स्वतः तयार करावी लोकांनी असे केले तर त्यांचे भारताच्या आर्थिक व नैतिक पुनरुज्जीवनाला मोठे योगदान मिळेल. गांधीजीच्या दृष्टीने भारताच्यअर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्याचे चरखा हे एक महत्वाचे साधन आहे.

**विश्वस्त :-** गांधीजीच्या सर्व विचारांच्या मुळाशी अहिंसेचे तत्व आहे. जगातील अनेक देशांना आर्थिक विषमतेच्या प्रश्नांना कित्येक शतकापासून ग्रासले आहे. आर्थिक विषमता दूर करण्यासाठी जगातील अनेक देशांत मोठ-मोठ्या क्रांत्या झाल्या तर अलिकडे युध्देही सुरु झाली आहे. आर्थिक विषमता दूर झाली नाही. परंतू गांधीजींनी रक्ताचा एक थेंबही न सांडता अगदी अहिंसक मार्गाने आर्थिक विषमता दूर करण्याचा अभिनव प्रयोग सांगीतला. त्यालाच विश्वस्त कल्पना असे म्हणतात. विश्वस्त म्हणजे दुसऱ्याच्या मालमत्तेचा व्यावस्थापक होय, असा विश्वस्त या शब्दाचा अर्थ आहे. गांधीजींनी दिन-दुबळ्या, गोर-गरीब यांच्या सेवेसाठी श्रीमंतांनी आल्याकडील पैसा इतरांना न्याय तत्व मानून द्यावा त्यामुळे गरीबांची गरीबी दूर होईल. गांधीजींनी असे सांगीतले की, श्रीमंतांनी आपल्या मिळकतीतील जेवढा पैसा आपल्या गरजा भागविण्यासाठी जेवढा लागेल तेवढाच वापरावा बाकीचा पैसा दीन-दुबळ्यांना व गोर-गरीबांना द्यावा. त्यामुळे देशातील संपत्तीचे न्याय वाटप होईल आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होईल. "गांधीजींनी आधी केले मग सांगीतले" आपल्या सर्व मिळकतीचा "विश्वस्त निधी" (ट्रस्ट) दक्षिण आफ्रिकेत आसतांनाच केला होता. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन भारतातील अनेक गर्भश्रीमंत लोकांनी ठिकठिकाणी विश्वस्त निधी निर्माण केली.

**सर्वोदय :-** सर्वोदय म्हणजे समाजातील फक्त एका वर्गाचा नव्हे तर सर्वा समाजाचा उदय, सर्वांचा उदय, सर्वांचे हित,सर्वांचे कल्याण, सर्वांचे मंगल, सर्वोदय असा सर्वोदयचा अर्थ आहे. गांधीजींनी म्हटले आहे की, समाजातील सर्व वर्गांनी व सर्व

जमातींनी आपल्या मर्यादेत रहावे व इतरांचे कुठल्याही प्रकारचे पिळवणूक करता कामा नये इतरांशी न्यायाने वागावे. आपांपसात मतभेद विसरुन गुण्यागोविंदाने जीवन जगावे. सद्याच्या युगात गरीब-श्रीमंत, जमीनदार, शेतकरी या सर्व वर्गामध्ये संघर्ष दिसत आहे. एकमेकांत द्वेष आहे. समाजात एकोपा दिसत नाही. परस्पराविरुध्द अविश्वास असून त्यातून समाजात अन्याय वाढत आहे. अशा या समाजातील परस्परांमध्ये विश्वास निर्माण होऊन समाजातील अन्याय दूर झाला पाहिजे म्हणजेच सर्वोदय होय. गांधीजींनी लोकांनी कशा प्रकारे जीवन यापन करावे या बद्दल अचारसंहिता सांगीतली आहे. स्वदेशीचा वापर लोकांचा जीवन नियम असेल लोकांनी आपले जीवन पवित्र ठेवण्यासाठी गांधीजींनी दारु व मांसाहारासाठी लोकांना दूर राहण्यास सांगीतले. त्यागाची भावना सांगीतली सर्व धर्मामध्ये आदर सांगीतले, तसेच सर्वोदय म्हणजे अहिंसेच्या वृत्ताचा स्विकार होय.

**स्वदेशी :-** प्राचीन काळात भारत देश हा समृध्द असा होता. तेंव्हा भारतातील लघु व कुटीर उद्योगात विविध प्रकारच्या सर्वोत्कृष्ठ व दर्जेदार वस्तु तयार होत असत परंतू भारतात इंग्रज आल्यापासून ती भरभराट राहीली नाही. इंग्लड कडुन येणाऱ्या मालामुळे भारतातील कुटीर व लघुउद्योग धंद्याचा नाश होत आला. भारतात तयार होणाऱ्या वस्तु खपेनाश्या झाल्या यातूनच भारतीय लोकांनी भारतात तयार होणाऱ्या वस्तूच वापरल्या पाहिजे त्यावेळी गांधीजींनी आपले विचार मांडले ते स्वदेशी चळवळीवर अधारीत होते. भारतीयांनी स्वदेशी मालच वापरावा अन्य प्रकारच्या परकीय मालावर बहिष्कार टाकावा असे केले तरच आपले उद्योग धंदे टिकतील व भरभराटीला येतील त्यामुळे बेकारी कमी होईल त्याचे उत्पन्न वाढेल असे त्यांचे मत होते. गांधीजींची स्वदेशीची कल्पना त्यावेळच्या स्वतंत्र्य लढ्यात अनेक दृष्टिने आवश्यक व उपयुक्त होत असे वरील विवेचनावरुन दिसून येते.

**निष्कर्षः-**

- भारतीय जीवन पध्दतीत ज्या मुल्यांना महत्व आहे. ती मुल्ये गांधीजींनी आत्मसाद करुन त्यांचा दैनंदिन जीवनात वापर केला व इतरांना सुध्दा त्यासाठी प्रवृत्त केले.
- गांधीजीचे सत्य व अहिंसात्मक विचार आजच्या अधुनिक काळातसुध्दा उपयुक्त आहेत. कोणत्याही देशात शांतता व अहिंसा असेल त्या देशाचा विकास झपाट्याने होते हे सिध्द होते. लोकांना स्वदेशी वस्तुचे महत्व कळले. त्यामुळे त्यांच्या कौशल्याला चालना मिळाली स्वंयरोजगाराची निर्मीती झाली.
- खेड्याकडे जनतेचा कल वाढला ओस पडलेली खेडी भरभराटीस येण्यास मदत झाली आजही त्या तत्वांचा अंगीकार करण्याची गरज भासू लागली



191

आहे. आजही शेती व शेतीवर आधारीत व्यवसाय करणाऱ्या लोकांचे प्रमाण जास्त आहे. शेत पिकावर आधारित उद्योग मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे आहे. त्याच्या फायदा ग्रामीण लोकांना होऊन नगराकडे जाणारे लोके थांबू शकतील.

- म. गांधींनी राजकीय व आर्थिक केंद्रीकरणाऐवजी विकेंद्रीकरणाचे समर्थन केले आहे. तसेच ते श्रमीकावर आधारीत उत्पादनाची साधणे, लघुउद्योग व ग्रामोद्योगावर भर देतात. त्यामुळे बेकारीचा प्रश्न दूर होण्यास मदत होते. असे गांधीजींचे मत होते.
- म. गांधीच्या स्वप्नातला भारत म्हणजे स्वातंत्र, समता, बंधुभाव व न्याय यांना महत्व देऊन समाजाची निर्मीती करणे हा होता. जगाच्या होणाऱ्या बदलांना स्विकारतांना खाऊजा धोरनांमुळे एकीकडे विकासाचा दर वाढत असला तरी जनसामान्याच्या जीवनाचा प्रश्न बिकट झाला आहे. स्वदेशी चालना दिली पण मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये व विदेशी गुंतवणुककीकडे स्वदेशीचा मुद्दा गौण ठरला

**संदर्भसूची :-**


1. प्रा. ठक्कर के. एच. (1993) अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास, विद्याप्रकाशन, नागपूर पृ.330 ३ 343
2. दाभोळकर नरेंद्र, (संपा.), सा. साधना, पुणे, 60 वा वर्षारंभ विशेषांक 11-18 ऑगस्ट 2009
3. International conference "Be the change you want ot see in the world" Mahatma Gandhi on 29th & 30th January 2016 organized by Gandhi Study Center New Arts Commerce College, Nalwadi, Wardha (M.S.)
4. आग्रवाल गंगाप्रसादजी, हिंद स्वराज्य मार्गदर्शक दस्तऐवज साम्ययोग साधना प्रकाशान धुळे, प्र.आ. 1 डिसेंबर 2005.
5. योजना मासिक, http://www/mkgandhi.org


❑❑❑



192